Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# बहिणाबाई चौधरी : खानदेशाच्या मातीतील अस्सल सोनं

**प्रा. डॉ. सौ. उज्वला पंकज नन्नवरे,** मराठी विभाग, नानासाहेब यशवंतराव नारायणराव चव्हाण, आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, चाळीसगाव.

**प्रस्तावना**

'अरे संसार संसार
जसा तावा चुल्यावर
आधी हाताला चटके
तव्हा मियते भाकर'

आजही स्वयंपाक करताना संसाराचा गाडा ओढतांना प्रत्येक स्त्रीच्या ओठांवर ही कविता सहज येते. सर्वांना आपल्या वाटणाऱ्या बहिणाबाईंच्या कविता जीवनाचे सार सांगून जातात. जीवनाचे तत्वज्ञान शिकवून जातात. इतिहासाच्या पानावर कर्तृत्व गाजवणाऱ्या कितीतरी वीरांगणांची नावे कोरली गेली आहेत. त्याचप्रमाणे बहिणाबाईंचे नाव देखील प्रत्येक माणसांच्या मनात कोरल गेल आहे. बहिणाबाई हे एक नाव नसून एक विद्यापीठ आहे त्यांना निसर्गकन्या, भूमि कन्या, कृषी कन्या, खानदेश कन्या, अशा विविध नावांनी संबोधले गेले. जीवनाकडे पाहण्याची त्यांची सकारात्मक दृष्टी व त्यातून सहज काव्य निर्मिती, उपजत प्रतिभा शक्ती, हे त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य आहे.

निसर्गात त्यांना जे गवसले ते त्यांनी कवितेतून मांडले. स्वानुभावातून शब्दांचे सौंदर्य फुलविले. सृष्टी निरीक्षणाची एक अजबदृष्टी त्यांच्याकडे होती. त्या निरक्षर होत्या पण अशिक्षित नव्हत्या त्यांच्या कवितेतून प्रकट होणारे तत्त्वज्ञान भल्या भल्यांना आश्चर्यचकित करणारे होते. नित्य नियमाच्या कामातून त्यांनी ज्या कविता मांडल्या त्या जीवनाचे सार सांगून जातात.

**बहिणाबाईंची सर्वसाधारण परिस्थिती**

**माहेर -** बहिणाबाई नथुजी चौधरी यांचा जन्म खानदेशातील जळगावपासून किमान सहा किलोमीटर अंतरावर आसोदा गावात, दिनांक ११ ऑगस्ट १८८० साली नागपंचमीच्या दिवशी झाला. आईचे नाव भिमाई तर वडिलांचे नाव उखाजी महाजन होते. त्यांना तीन भाऊ व तीन बहिणी होत्या. उखाजी महाजन हे गावातील जमीनदार होते, ते गावातील करते पुरुष होते, बहिणाबाईच्या शब्दात सांगायचे तर....

बापजीच्या हायलीत येती शेटे शेतकरी
दारी खेटरांची रास घरी भरली कचेरी
गावामधी दबदबा बाप महाजन माझा
त्याचा काटेतोल न्याव जसा गावामधी राजा

यावरून त्यांच्या माहेरच्या परिस्थितीचा अंदाज येतो त्या एक सधन कुटुंबातील होत्या.

**सासर -** बहिणाबाईचे लग्न वयाच्या तेराव्या वर्षी झाले. जळगावातील खंडेराव चौधरी यांच्या त्या सून झाल्या, त्यांचा नथुजी चौधरी यांच्याशी विवाह झाला, त्यांचे वतनदार घराणे होते. एकत्र कुटुंब पद्धतीत त्या नांदत होत्या, कालांतराने तिघा भावांचे कुटुंब वेगळे झाले. दुष्काळानंतर बहिणाबाईंच्या हाती विळा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आला. जळगाव येथील मेहरुण तलाव खोदण्याचे काम देखील त्यांनी केले. त्यांनी हातोडी घेऊन खडी देखील फोडली. मेहरूण तलावाचे वर्णन करताना त्या म्हणतात,

‘मेहरूणचा तलाव नाही लहानसहान
असे त्याने भागवली जयगावची तहान-तहान’

नवऱ्याबरोबर भाजीभाकरी बांधून त्या खडी फोडायला जायच्या. दुपारी जेवणाच्या वेळी त्या सर्वांना म्हणत, ‘अरे पोटोबाच्या आधी विठोबाचे नाव घ्या’

देवाची नामस्मरण करीत सर्व जेवत असत. घरी जाताना सर्व बायका हाताला पडलेले घट्टे एकमेकांना दाखवीत असत तेव्हा बहिणाबाई त्यांना म्हणत,

‘टाया पिटीसन देव भेटत नही,
ज्याच्या हाताला घट्टे त्यालेच देव भेटते’

ऐन तारुण्यात म्हणजेच वयाच्या ३० व्या वर्षी बहिणाबाईंना वैधव्य आले. अल्पशा आजाराने त्यांच्या पतीचे निधन झाले. सांत्वन करायला आलेल्या बायकांचे त्याच सांत्वन करताना म्हणतात,

‘नका नका आया बाया नका करू माझी कीव,
झालं माझं समाधान आता माझा मले जीव’

शेजारच्या आयाबाया सांत्वनासाठी बहिणाबाई कडे येतात, किती वाईट झालं असं म्हणतात, तेव्हा बहिणाबाई म्हणतात, माझा संसार करून झालाय. संसाराचे सुख समाधान मी भोगले अनुभवलंय, त्यामुळे तुम्ही आता माझी कीव करू नका. आलेल्या परिस्थितीचा त्या स्वीकार करतात व प्राप्त परिस्थितीचे आव्हान स्वीकारतात आणि म्हणून म्हणतात आता माझा जीव माझ्यासाठी आहे. अशाप्रकारे सासरी व माहेरी दोन्ही प्रकारचे जीवन जगताना त्यांनी कधीही नशिबाला दोष दिला नाही जे आहे त्याचा त्यांनी स्वीकार केलेला दिसतो.

**बहिणाबाईच्या कवितेतून व्यक्त होणारे तत्त्वज्ञान**

बहिणाबाई निरक्षर असल्या तरी, त्या अडाणी नव्हत्या. त्यांच्या कवितेतून प्रकट होणारे तत्वज्ञान भल्याभल्यांना आश्चर्यचकित करणारे होते. इथे नित्याच्या कामातून त्यांनी ज्या कविता मांडल्या त्या जीवनाचे सार सांगून जातात. माणूस नेहमीच सुखाची अपेक्षा करतो, पण त्याला सुख सहजासहजी मिळत नाही. जीवनातील चढ-उतार भोगल्याशिवाय, सुख मिळत नाही तसेच सुखालाही दुःखाशिवाय किंमत नाही. संसाराच्या वाटेवर अनेक चढ उतार असतात याच चढ उतारावरून त्या संसाराविषयी मत मांडताना म्हणतात,

‘अरे संसार संसार
खोटा कधी म्हनू नही
राऊळाच्या कयसाले
लोटा कधी म्हनू नही’

जीवनाचे बालपण, तारुण्य, प्रौढपण आणि म्हातारपण असे टप्पे पडतात. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात आपण एक विशिष्ट आयुष्य जगत असतो, जसे बालपणीचे निरागस आयुष्य, प्रौढावस्थेतील


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

समजदारपणा, म्हातारपणात देवाची भक्ती, हे टप्पे जसे आयुष्यात येतात, तसाच टप्पा तारुण्यातील संसाराचा असतो व तो कोणालाही चुकत नाही जसे मंदिरावरील कळसाला कळसच म्हणतो लोटा म्हणत नाही त्याचप्रमाणे संसार देखील खोटा नसतो सुखदुःखाचा हा रहाट गाडा प्रत्येकाच्या वाट्याला येतो. त्याला गळ्यातील लोडण किंवा पायातील अडसर न म्हणता ऊन सावलीचा हा खेळ आनंदाने जगावा. संसाराची महती अगदी सहज व साधेपणाने त्यांनी समजावून सांगितली तसंच मनाची गूढता स्पष्ट करताना त्या म्हणतात,

'मन एवढ एवढं
जसा खाकसचा दाना
मन केवढं केवढं
आभायात बी मायेना'

यात मानवी मनाच्या संकुचित व विशालतेच वर्णन केलेलं आहे. बऱ्याचदा अगदी शुल्लक वस्तू ज्याची आपल्याला गरज नसते ती सुद्धा कोणाला देत नाही म्हणून बहिणाबाई येथे मनाला खसखसच्या दाण्याची उपमा देतात, तो जसा छोटा असतो तसं कधी आपलं मन छोटं संकुचित वृत्तीच होतं तर कधी आपल्याला नितांत गरज असणारी वस्तू कोणी मागितली की, ती आपण सहज देऊन टाकतो म्हणजे आपल्यापेक्षा समोरच्याची गरज मोठी आहे असा विचार करतो म्हणून मन हे आभाळासारखं देखील असतं. अशा माणसाच्या बदलत जाणाऱ्या मनाबद्दल बहिणाबाई सहजपणे सांगतात. निसर्गाने माणसाला बुद्धी ताकद सर्व दिल पण माणूस कधी कधी निर्बुद्ध असल्यासारखा वागतो. सर्व असून सुद्धा काहीच करत नाही पण निसर्गामध्ये कितीतरी गोष्टी अशा आहेत ज्या आपल्याला त्यांचा मोठेपणा दाखवून देतात. छोट्या छोट्या घटकांपासूनही शिकण्यासारखं भरपूर काही असतं हे स्पष्ट करताना बहिणाबाई म्हणतात,

'तिची उलूशीच चोच
तेच दात तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोट'

छोट्याशा सुगरणीची चोच किती छोटी छोट्याशा चोचीच्या सहाय्याने ती इतका अप्रतिम खोपा बांधू शकते मग माणूस तुलनेने तिच्यापेक्षा कितीतरी मोठा व बुद्धिमान प्राणी आहे तिला तर दातही नाही आणि ओठ ही नाही तरी ती सुंदर जाळीदार घरटं विणते माणसाला तर दोन हात आणि दहा बोटं दिली आहे त्याने तो काहीही करू शकतो. इथे बहिणाबाई माणसाच्या सामर्थ्याची जाणीव करून देतात. पण माणूस खूप आळशी आहे तो आपले काम दुसऱ्यावर सोपवीत असतो. इतरांच्या कष्टावर आपलं काम काढून घेण्याची त्याला सवय असते. या छोट्याशा पक्षाच्या रूपाने बहिणाबाई माणसाच्या कर्तृत्वाला जागृत करण्याचा प्रयत्न करतात.

बुद्धीवादी प्राणी असून देखील माणूस इतर प्राण्यांप्रमाणे वागायला लागला आहे. स्वार्थी होऊन माणूस त्याच्यातील माणुसकी विसरला आहे. त्याच्या वागण्याचा बहिणाबाईंना त्रास होतो माणसाने माणसाप्रमाणे वागावे असे त्यांना वाटते. माणसाच्या या जनावरासारख्या वागण्याच्या वृत्तीचे दुःख त्यांना होतं. माणसाचा माणूस कधी होईल याची सल त्यांच्या माणूस या कवितेतून प्रकर्षाने जाणवते त्या म्हणतात,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

'मानसा मानसा
कधी व्हशीन मानूस
लोभासाठी झाला
मानसाचा रे कानुस'

बहिणाबाईंना माणसाच्या अशा वागण्याची खंत वाटायला लागते. व शेवटी त्या म्हणतात तू माणूस कधी होणार? माणसाचा खरा धर्म सर्वांशी प्रेमाने वागावे सर्वांना मदत करावी भुकेल्या माणसाला जेवण द्यावे आणि अडचणीला धावून जावे, मोठ्यांची सेवा करावी. पण लोभापाई माणसांनी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. तो आज माणुसकी विसरून पशुंपेक्षाही खालच्या पातळीला गेला आहे. पण आज माणसाने वेळेत सावध होण्याची गरज आहे. नाहीतर त्याचीही बुद्धी एक दिवस त्याचाच विध्वंस करून टाकेल. आयुष्य हा पाण्याचा बुडबुडा आहे. पण माणसाला मात्र हे समजत नाही जीवन मृत्यूच्या चक्रात अडकलेल्या माणसाला हे कळत नाही की प्रत्येकाला मरण हे अटळ आहे. जाताना आपण सोबत काय घेऊन जाऊ? हे माहित नसताना देखील माणूस पूर्ण आयुष्य हे माझं, हे माझं करण्यात घालवतो. क्षणाचाही इथे भरवसा नसताना माणूस असा वागत असतो त्याविषयी बहिणाबाई म्हणतात,

'आला सास गेला सास
जीवा तुझं रे तंतर
अरे जगनं मरनं
एका सासाचं अंतर'

जिवंत असण्याची खुण म्हणजे श्वासाच येणं जाणं होय. जोवर श्वास सुरू असतो तोवर माणूस जिवंत असतो. एका क्षणात श्वासाच बंद होणं म्हणजे मृत्यू उदाहरणार्थ एखादा माणूस रस्त्याने चालत असताना तो सर्वांना दिसतो पण क्षणात एखादी गाडी येते व त्याने त्याचा अपघात होतो त्याचा जागीच मृत्यू होतो म्हणजे क्षणापूर्वी जिवंत असणारा व्यक्ती दुसऱ्या क्षणी मरतो. जगण्यात व मरण्यात फक्त एका श्वासाच अंतर आहे. जीवनाचे एवढं मोठं सत्य बहिणाबाई किती सहज सांगून जातात यावरून त्या किती मोठ्या तत्त्वज्ञ आहेत हे दिसून येतं. जीवन म्हणजे अनिश्चितता तर मृत्यू म्हणजे त्रिकाल बाधित सत्य होय. असं हे जीवन जगत असताना प्रत्येकाने प्रत्येकाचा आदर करावा. सर्वांशी हसून खेळून वागावं. असे इथे बहिणाबाई सुचवतात. आपल्यामुळे इतरांना आनंद देत राहावे असे त्यांना वाटते आणि म्हणून त्या म्हणतात,

'जग जग माझ्या जीवा
असं जगणं तोलाच
उच्च गगनसारख
धरित्रीच्या रे मोलाचं'

माणसातील माणुसकीला जागून जीवनाची पातळी उंचविण्याचा संदेश येथे बहिणाबाई देतात. जीवन म्हणजे जगलो नाही तर मेल्यानंतरही आपण इतरांच्या स्मरणात राहणे म्हणजे जगणे होय, आणि आपण स्मरणात तेव्हाच राहू जेव्हा आपण दुःखी पीडितांचे अश्रू पुसू, रंजल्या गांजलेल्यांची सेवा करू. आपण या समाजात राहतो या समाजाचे देणेकरी लागतो असे समजून जर सेवाभावी वृत्ती ठेवली तरच


Copyright © | JET Network, All Rights Reserved

आपलं जगणं हे जगण्यासारखे उंच व धरती सारखं विशाल होईल असे बहिणाबाई म्हणतात. या कवितेतून त्यांचा जीवन विषयक विशिष्ट व वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन शाश्वत मूल्यांचे दर्शन घडवितो.

आजचा तरुण स्वतःच्या कर्तृत्वापेक्षा दैवावर नशिबावर विश्वास ठेवणारा आहे. बहिणाबाईंना वैधव्य आल्यानंतर सर्व संसाराचा गाडा त्यांच्या खांद्यावर आला पण त्यांनी कधीही नशिबाला दोष न देता कष्टावर विश्वास ठेवला. नशिबी आलेल्या वैधव्याने त्यांचे जीवन कष्टमय झाले. शेतात राबून राहून हातावरच्या रेषा मिटल्या. असं असताना ज्योतिषी हात बघून धनरेषा आहे याबद्दल त्यांना शंकाच वाटते, म्हणून त्या ज्योतिषाला म्हणतात तळ हातावर कष्टाच्या खुणा आहेत तू थापा मारू नकोस माझ्या नशिबाचे नवग्रह पायाला भिंगरी लावल्यासारखे मला फिरवत आहेत. माझ्या नशिबी आलेले कष्ट मला स्वस्थ बसू देत नाही. ग्रह जसे फिरतात तसे माझे नशीबही फिरले आहे कष्टाशिवाय मी माझे नशीब बदलू शकत नाही असं जेव्हा त्यांना वाटतं तेव्हा त्या म्हणतात,

‘नको नको रे ज्योतिषा
नको हात माझा पाहू
माझं दैव माले कये
माझ्या दारी नको येऊ’

त्या देवाला फक्त एकच विनवणी करतात की, माझी दोन्ही मुलं फक्त सुखी राहू दे. नशीब नशीब म्हणजे तरी काय ? तर फक्त सुख आणि जर माझे दोन्ही मुलं सुखी झाले याहून वेगळे तरी काय ? म्हणून त्या ज्योतिषाला म्हणतात की माझा हात बघून नकोस. त्यांचा कष्टावर विश्वास आहे. नशिबावर नाही आणि म्हणून त्या म्हणतात माझं नशीब मला कळतं तू माझ्या दारात अजून नशीब सांगायला येऊ नकोस. नशिबापेक्षा त्या कर्मावर विश्वास ठेवतात आपण जसं कर्म करतो त्याप्रमाणे आपल्याला फळ मिळत असतं आणि हे कर्तव्य कोणा एकाच नसून सर्वांचाच असतं. समाजात असणाऱ्या सजीव निर्जीव प्रत्येकाचं काही ना काही कर्तव्य असतं आणि या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी त्या कशाला काय म्हणू नही या कवितेत म्हणतात,

‘निजवते भुक्या पोटी
तिले रात म्हनू नही
आखडला दानासाठी
त्याले हात म्हनू नही’

दिवसभर काबाडकष्ट करून ही रात्री पोटाला दोन घास नसतील तर उपाशी झोपावं लागत असेल तर ती रात्र काही कामाचे नाही. उपाशीपोटी कोणाला झोप लागत नाही आणि झोपे वाचून जर रात्र जात असेल तर तिला रात्र का म्हणावे ? हाताचं काम आहे दुसऱ्यांना काही ना काही देणं मदत करणं पण हाताने त्याचं कर्तव्य करणं सोडलं तर तो हात कसला. गरजवंतांना मदतीसाठी दानासाठी आपला हात आखडता घेत असू तर त्या हातांनी कोणते चांगले काम होऊ शकत नाही. एकंदरीत प्रत्येकाचं कर्म हे ठरलेलं असतं पण त्यानुसार ते काम होत नसेल तर त्याला काहीच अर्थ नसतो. सर्व गोष्टी अर्थहीन होऊन जातात.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

जन्माला आलेल्या प्रत्येकाचं कर्म ठरलेलं असतं प्रत्येक घटकाला आपल्या कर्मानुसार कर्तव्य करावे लागते. बहिणाबाईच्या या कवितेतून प्रत्येकाला त्यांच्या कर्माची त्या जाणीव करून देतात.

बहिणाबाईंचे जीवन कृषी जीवनाशी निगडित आहे. त्यांच्या कवितेतून शेतकरी जीवनाचे त्या दर्शन घडवितात. शेतकरी आणि निसर्गचक्र यांचे अतूट नाते असते आणि पाऊस म्हणजे शेतकऱ्याचा जीव की प्राण असतो. शेतकऱ्यांचे जीवनच पावसाशी निगडित असते. पाऊस पडल्यानंतर सर्व धरती जणू हिरवा शालू नेसते, सर्वत्र हिरवळ पसरते पाऊस म्हणजे जीवन असा हा पाऊस पडल्यानंतर जमिनीत नवनिर्मितीची प्रक्रिया सुरू होते. जमिनीत बी रुजवले की कालांतराने कोंब टरारून वर येतात, या सर्व नित्याच्या गोष्टी आहेत पण त्यांचं वर्णन कवी मनाच्या बहिणाबाईंनी त्यांच्या अप्रतिम अशा 'देव अजब गारोडी' या कवितेतून केलेले आहे. निसर्गातील या घटनेचा अतिशय सूक्ष्म निरीक्षण करताना त्या म्हणतात,

'धरत्रीच्या कुशीमधी
बिया बियान निजली
व्हरे पसरली माटी
जशी शाल पांघरली'

या कवितेच्या ओळीत बहिणाबाई एका गर्भवती स्त्रीची व धरतीच्या कुशीत रुजलेल्या बी बियाणांची सांगड घालताना दिसतात. गर्भवती स्त्रीच्या पोटातील बाळ जसं तिच्या उदरात सुरक्षित असतं व शांतपणे झोपलेलं असतं तसंच धरतीच्या कुशीत रुजलेलं बीज जणू शांत झोपलेल असत. पेरणी करताना बीज जमिनीत पेरून वरून माती पसरवली जाते, जणू काही शाल पांघरली आहे. असे बहिणाबाई म्हणतात. बाळ जस आईच्या उदरात सुरक्षित असतं तस धरतीच्या उदरात बीज वरून माती पसरल्याने सुरक्षित असत. आई जशी पोटातल्या बाळाची काळजी घेते तशीच धरती देखील तिच्यात रुजवलेल्या बिजांची काळजी घेते असे अप्रतिम वर्णन बहिणाबाई या कवितेत करताना दिसतात.

**समारोप**

मराठी साहित्यातील मराठीचा व्यापक आयाम जपणार जोपासणार नाव म्हणजे बहिणाबाई चौधरी. मौखिक परंपरेचा सशक्त वारसा असणाऱ्या शेती मातीशी घट्ट नाळ जोडलेली असणाऱ्या बहिणाबाईंना अशिक्षित म्हणणे चुकीचे ठरेल. बहिणाबाईंच्या कवितेचे विषय हे जीवनाचे भाष्य करणारे आहेत. स्त्रीच्या संवेदना मातीचा ओलावा, आभाळाची माया, जीवन जाणिवेचे प्रगल्भ आकलन, मानवी मनाचा ठाव, कृषी संस्कृती विषयक जिव्हाळा, या सर्वांमधून बहिणाबाईंच्या कविता फिरताना दिसतात.

बहिणाबाईंच्या कवितेतून प्रकट होणारे जीवन विषयक तत्वज्ञान, सूक्ष्म निरीक्षण, सूक्ष्म चित्रण, चिंतनशीलता, जीवनमूल्य, उगवती भाषाशैली, संवेदनशीलता, कर्मनिष्ठा, प्रयत्नवाद, या अनेक गुणांचा आविष्कार त्यांच्या कवितांमधून होताना दिसतो. साध्या सोप्या रसाळ भाषेने जीवनाचे शुद्ध तत्त्वज्ञान सांगणाऱ्या बहिणाबाई चौधरी या खानदेशच्या भूषण आहेत. संकटांचा सामना करीत संसारांचे गाणे गात त्यांनी जीवनाचे सार, अनुभव, तत्वज्ञान आपल्या कवितेत मांडले आणि समस्त बुद्धिवाद्यांना चकित केले. बहिणाबाईंनी त्यांच्या कवितेत फक्त मानवी जीवनच नव्हे तर सृष्टीच्या प्रत्येक अंगाला स्पर्श केलेला आहे. बहिणाबाईंच्या कवितेत जिव्हाळा अलौकिक प्रतिभा तर आहेच पण त्याचबरोबर निसर्ग प्रतिमांनी त्यांच्या कविता नटलेल्या आहेत आणि म्हणूनच बहिणाबाईंची गाणी अजरामर आहेत. साहित्यांत त्यांच्या


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कवितांनी मोलाची भर घातलेली आहे. अशिक्षित असून देखील जीवनाचं सार त्यांच्या कवितेतून त्यांनी मांडलं आहे.

**संदर्भग्रंथ सूची**

१. डॉ. प्रमिला भिरुड, बहिणाबाईची गाणी अमृतवाणी, ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, एप्रिल २०१४

२. श्री. निळकंठ रामदास पाटील, सौ. उर्मिला निळकंठ पाटील लेवा, गणबोली कोश, प्रकाशक -भोरगाव लेवा पंचायत, जळगाव विभाग.

३. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, स्वागत, बहिणाबाई ची गाणी :एक अभ्यास, प्रमिला भिरूड, व्यंकटेश प्रकाशन, जळगाव, प्रथम आवृत्ती २००३.

४. स्नेहलता चौधरी,' जीवन विषयक तत्त्वज्ञान सांगणाऱ्या कविता', भूमिकन्या बहिणाबाई चौधरी: एक चिंतन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती २००२.

५. डॉ. प्रमिला भिरूड ब., हिणाबाईची जीवन कहाणी, व्यंकटेश प्रकाशन, जळगाव ,प्रथम आवृत्ती २००९.


Copyright © | JET Network, All Rights Reserved